

**डॉ अनंत कळसे,**
**प्रधान सचिव**

| | | |
|---|---|---|
| **जन्म** | : | २४ जून १९५८. |
| **जन्म ठिकाण** | : | राजुरा, ता. राजुरा, जि. चंद्रपूर. |
| **शिक्षण** | : | बी.एस्‌सी., एल.एल.एम., पी.एच.डी. (विधी) |
| **ज्ञात भाषा** | : | मराठी, हिंदी व इंग्रजी. |
| **वैवाहिक माहिती** | : | विवाहित, पत्नी श्रीमती मंगला. |
| **अपत्ये** | : | एकूण १ (एक मुलगा). |
| **इतर माहिती** | : | सुरूवातीस काही काळ जिल्हा व सत्र न्यायालय, औरंगाबाद येथे वकिली; महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयामध्ये अधीक्षक (राजपत्रित) म्हणून १९८० मध्ये सेवेस प्रारंभ, तद्‌नंतर सहायक सचिव, अवर सचिव, उप सचिव, सह सचिव, अतिरिक्त सचिव या पदांवर काम केले; १९९० पासून राज्यसभेच्या व विधानपरिषदेच्या द्वैवार्षिक निवडणुकांचे निवडणूक निर्णय अधिकारी पदाची जबाबदारी सांभाळली, या कालावधीत उत्तमप्रकारे केलेल्या कामाची नोंद घेऊन भारतीय निवडणूक आयोगाकडून "उत्कृष्ट निवडणूक निर्णय अधिकारी" म्हणून प्रशस्तीपत्रक देऊन सन्मानित केले; पंजाब, आंध्र प्रदेश, दिल्ली, उत्तर प्रदेश, ओरिसा, पश्चिम बंगाल इ. ठिकाणच्या पीठासीन अधिकाऱ्यांच्या अखिल भारतीय परिषदांत विधिमंडळ सचिव व प्रधान सचिव म्हणून सहभाग; कायदेविषयक अभ्यासाचा व्यासंग; शासकीय विधी महाविद्यालय, चर्चगेट, मुंबई तसेच के.सी. विधी महाविद्यालय, मुंबई येथे मानसेवी प्राध्यापक; मुंबई विद्यापीठात पदव्युत्तर विधी विभागात (Post Graduate Department) मानसेवी प्राध्यापक म्हणून कार्यरत; संसदीय प्रथा व परंपरा, भारतीय संविधान व प्रशासन या विषयावर यशदा पुणे, मुंबई विद्यापीठ, विविध शासकीय कार्यालये, इंडियन इन्स्टिट्‌युट ऑफ पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन, मंत्रालय, मुंबई, मेरी संस्था, नाशिक इत्यादी संस्थामध्ये आयोजित केलेल्या अभ्यास- वर्गांसाठी तज्ज्ञ व्याख्याते म्हणून सहभाग; जुलै २००३ ते जुलै २००६ पर्यंत सचिव, जुलै २००६ ते मार्च २००७ प्रधान सचिव (२) व २००७ पासून महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या प्रधान सचिव पदावर कार्यरत. |
| **परदेश प्रवास** | : | राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखेच्यावतीने संसदीय अभ्यासदौऱ्यांच्या निमित्ताने ब्रिटन, फ्रान्स, इटली, स्वित्झरलॅंड, हॉलंड, बेल्जियम, न्युझिलॅंड, ऑस्ट्रेलिया, सिंगापूर, मलेशिया, चीन, हॉंगकॉंग, नायजेरिया इ. विविध देशांना भेटी; भारतीय संसदे-मार्फत नायजेरिया येथील राष्ट्रकुल संसदीय मंडळाच्या पीठासीन अधिकाऱ्यांच्या अखिल भारतीय परिषदेसाठी प्रधान सचिव म्हणून अफ्रिकन देशांचा अभ्यास दौरा. |
| **छंद** | : | वाचन व लेखन (संसदीय प्रथा, परंपरा, संसदीय महत्त्वाचे विषय, संविधान, भारतीय प्रशासनिक कायदा या संबंधी वाचन व लेखन), संगीत, कला, साहित्य - काव्यविषयक विशेष आवड |
| **पत्ता** | : | १६, सागर, चौथा मजला,<br>'बी' रोड, चर्चगेट, मुंबई ४०० ०२०.<br>दूरध्वनी : निवास : २२८४५२०६<br>कार्यालय : २२०२६६९३/ २२०२८२१७/२२८४५०७२.<br>फॅक्स क्र : २२०२४५२४<br>मोबाईल : ९८२०२२२४२३.<br>ई. मेल : kalsean@rediffmail.com |